प्रेसनोट

## ''छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती ''

जा.क्र. ९३ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९ /०२/२०१८

**भंडारा:–** पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. १९/०२/२०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह) नागरे, यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणाली बाबत माहीती देण्यात आली.

सुमारे ३०० वर्षापुर्वी आपल्या महाराष्ट्रात मोगलांचे राज्य होते, त्याकाळात हिंदुचा अनेक प्रकारे छळ होई. अशा वेळी शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य स्थापन केले, म्हणुन आपण ''छत्रपती शिवाजी महाराज की जय'' असा जयघोष करतो. शिवाजींच्या वडीलांचे नाव शहाजीराजे, निजाम शाहीत ते मोठे सरदार होते, शिवाजींच्या आईचे नाव जिजाबाई होते, शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फरवरी १६३० रोजी शिवनेरी किल्यावर झाला. शिवनेरीवर शिवाईचे देऊळ आहे, या देवीच्या नावावरून जिजाबाईने आपल्या या मुलाचे नाव शिवाजी असे ठेवले, शिवाजी महाराज अत्यंत शुर व बुध्दीमान होते, आपले राज्य आपल्या मालकीचे आहे असे न मानता त्यानी ते प्रजेच्या मालकीचे मानले, प्रजेला संरक्षण दिले, अन्याय करणाऱ्यांना त्यांनी कठोर शासन केले, शिवाजी राजे अत्यंत सात्वीक वृत्तीचे होते आई – वडील, मोठी मानसे, साधु संत व ईश्वर यांच्या समोर ते नेहतीच नतमस्तक असत त्यांनी कधीही गैर वर्तन केले नाही, त्यामुळे प्रजेला वंदनीय वाटत असा गुनी राजा शतकानु शतकातुन एकदाच होत असतो, मग तो तेव्हा आणी आताही प्रातस्मरणीय का बरे होणार नाही. अशा या थोर पुरूषाची जंयती साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. कदम नियत्रंण कक्ष अधिकारी, पोनी. तेलुरे, पोनी. घुसर, पोनी. मंडलवार, पोनी. कदम, सपोनी. पोटे, सपोनी. राहागंडाले, सपोनी. हत्तीमारे, पोउपनी. तुळजेवार, पोउपनी. पंधरे, पोउपनी. देशमुख, पोउपनी. आडोळे, पोउपनी. माळी, मपोउपनी. चाटसे, मपोउपनी. लांजेवार राखीव पोलीस निरीक्षक पोनी. वर्मा, उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

PSC

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.